**वाचले :-**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.१९/०५/२०२०.
५) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.२४/२० दि.१७/०५/२०२०.
६) गृह मंत्रालय भारत सरकार यांच्याकडील आदेश क. ४०-३/२०२०-DM-I(A) दि. ३०/०५/२०२०
७) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.३१/०५/२०२०.

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.२५/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक ३१/०५/२०२०

**आ दे श :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक असल्याने उपोद्घातातील अ.क्र.५ अन्वये पालघर जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत निर्गमित करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ६ व ७ अन्वये केंद्र शासन व राज्य शासन यांनी दि.३०/०६/२०२० पर्यंत राज्यामध्ये लॉकडाऊन लागू राहील, असे जाहीर केले आहे. तसेच सदरहू शासनाचे दिनांक ३१/०५/२०२० रोजीच्या आदेशासोबत जोडलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत असलेल्या वसई विरार शहर महानगरपालिका व उर्वरीत पालघर जिल्हयाच्या क्षेत्रामध्ये निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने पालघर जिल्हयात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी व जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून उपोद्घातातील अ.क्र.५ अन्वये पारीत केलेला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दि.३०/०६/२०२० पर्यंत लागू ठेवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पालघर जिल्हयामध्ये **दिनांक ०१/०६/२०२० रोजी रात्री १२.०१ ते दिनांक ३०/०६/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत मनाई आदेश लागू करीत आहे.**

सदरहू आदेश लागू झाल्यापासून उपोद्घातातील अ.क्र.७ मधील दि.३१/०५/२०२० रोजीच्या शासन आदेशासोबत जोडलेल्या मार्गदर्शक सुचनांमधील अ.क्र.८ मधील खालील बाबींना प्रतिबंध राहील.

१) पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी शाळा, जिल्हा परीषद शाळा, अनुदानित/विनाअनुदानीत, सर्व आश्रमशाळा, निवासी आश्रमशाळा, महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था व कोचिंग क्लासेस बंद राहतील.
२) गृह मंत्रालयाने परवानगी दिलेल्या बाबी वगळून आंतराष्ट्रीय प्रवासी हवाई वाहतूक बंद राहील.
३) मेट्रो रेल्वे बंद राहतील.
४) शासनाकडून प्राप्त होणारे विशेष आदेश व मानक कार्यप्रणालीनुसार रेल्वे व डोमॅस्टीक एअर लाईन्स व्दारे प्रवाशांची वाहतूक करण्यास परवानगी राहील.
५) सिनेमा गृहे, व्यायाम शाळा, जलतरण तलाव, मनोरंजन केंद्रे, चित्रपटगृहे, बार, सभागृहे, एकत्रित जमण्याची ठिकाणे आणि तत्सम इतर ठिकाणे.
६) सर्व सामाजिक/ राजकीय/ क्रिडा विषयक/ मनोरंजन/ शैक्षणिक/ सांस्कृतिक/ धामिक कार्यक्रम/ इतर संमेलने आणि मोठया प्रमाणात एकत्र येणे (Large Congregations).
७) सर्व धार्मिक स्थळे तसेच इतर सर्व प्रार्थना स्थळे भाविकांना दर्शनासाठी बंद राहतील.
८) केस कर्तनालय, स्पा, सलून, ब्युटी पार्लर बंद राहतील.
९) शॉपिंग मॉल, हॉटेल, रेस्टॉरंट व इतर आदरातिथ्य सेवा बंद राहतील.

तसेच उपोद्घातातील अ.क्र.७ मधील दि.३१/०५/२०२० रोजीच्या शासन आदेशासोबत जोडलेल्या मार्गदर्शक सुचनांमधील अ.क्र.७ चे एफ नुसार सर्व बाजारपेठा/दुकाने सकाळी ०९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत खुले राहतील. व इतर बाबींबाबत या कार्यालयाकडून स्वतंत्र आदेश निर्गमित केले जातील.

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधिताना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ ते ६० मधील तरतुदीनुसार व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक :-३१/०५/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

सही/-xxx
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

प्रत :-
१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.